# जपानी पुष्परचना - भाग १९




अगदी साधी मुक्तरचना आहे नाही का? दोन सदाफुलीची फुले आणि झाडाची वाळलेली पाने!! बारा महिने फुलणारी सदाफुली, रचना करताना नेहमी मदतीला येते. वास थोडा कडवट, पण सतत बहरून बागेचे सौन्दर्य वाढविणारी, आनंदी, उत्साही, सुंदर, वेगवेगळे रंग धारण करणारी गुणी फुलझाडं!!

या सदाफुली बरोबर एकच पिवळे शेवंतीचे फूल वापरले आहे.

वाळलेली झाडाची पाने आपण टाकाऊ समजतो. पण त्याचाही रंग सुंदर दिसतो आहे. नवीन पानांसाठी जुनी पाने गळून पडतात, निसर्गाच्या नियमाप्रमाणे!

घराभोवती खूप पडलेल्या पानांकडे पाहून ही कल्पना सुचली. अगदी कमी आणि मोजक्या पाना फुलातून रचना करणे हे जपानी पुष्परचनेचे वैशिष्ठ्य इथे दिसते. ही रचना मी त्या वाळलेल्या पानांना अर्पण करू इच्छिते.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो पुणे शाखा

ई-मेल - asdssd@gmail.com

फोन -9881043456